“हर घर तिरंगा अभियांन” या केंद्र शासनाच्या अभियाना अंतर्गत पुराभिलेख संचालनालयामार्फत “विभाजन विभीषिका स्मृतीदिन” निमित्त राज्यस्तरीय प्रदर्शन आयोजित करण्याच्या उपक्रमांवरील होणाऱ्या खर्चास प्रशासकीय मान्यता देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन

पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग

शासन निर्णय क्रमांक : मपुवि-२०२६/प्र.क्र.११५(ई-१७९३४४३)/सां.का.२

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई-३२.

दिनांक : १७ ऑगस्ट, २०२६.

वाचा : १) पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, क्र.संकीर्ण-८२२५/प्र.क्र.४०७/ सां.का.४, दि.२७.०७.२०२६ रोजीचे पत्र

२) पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, क्र.संकीर्ण-८२२५/प्र.क्र.४०७/ सां.का.४, दि.०४.०८.२०२६ रोजीचे पत्र

३) संचालक, पुराभिलेख संचालनालय, मुंबई यांचे पत्र क्र. पुरा.संचा/लेखा/ विभिषिका /२०२६/बी-२४०२, दि.०६.०८.२०२६

प्रस्तावना :-

केंद्र शासनाच्या निर्देशानुसार हर घर तिरंगा या अभियांनांतर्गत दि.०९.०८.२०२६ ते १७.०८.२०२६ या कालावधीत विविध कार्यक्रम/उपक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे. त्या अनुषंगाने संदर्भ क्र.१ व २ येथील पत्रान्वये राज्यांतर्गत विविध कार्यक्रम/उपक्रम राबविण्याबाबत या विभागामार्फत सूचना देण्यात आल्या आहेत. सदर सूचनान्वये पुराभिलेख संचालनालयामार्फत “विभाजन विभीषिका स्मृतीदिन” (१४ ऑगस्ट हा दिवस 'फाळणी शोकांतिका स्मृतीदिन) निमित्त राज्यस्तरीय कार्यक्रम, नाटय व प्रदर्शन हे कार्यक्रम/उपक्रम आयोजित करण्याबाबत निर्देश दिले आहेत. संदर्भ क्र.३ येथील पत्रान्वये संचालक, पुराभिलेख संचालनालय, मुंबई यांनी हर घर तिरंगा अभियांना अंतर्गत “विभाजन विभीषिका स्मृतीदिन” (१४ ऑगस्ट हा दिवस 'फाळणी शोकांतिका स्मृतीदिन) निमित्त प्रदर्शन आयोजित करण्याच्या उपक्रमास प्रशासकीय मान्यता देणेबाबत विनंती केली आहे. त्या अनुषंगाने सदर प्रदर्शनाच्या उपक्रमास प्रशासकीय मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती.

शासन निर्णय:-

“हर घर तिरंगा अभियान” या केंद्र शासनाच्या अभियाना अंतर्गत दि.०९.०८.२०२६ ते १७.०८.२०२६ या कालावधीत पुराभिलेख संचालनालयामार्फत “विभाजन विभीषिका स्मृतीदिन” (१४ ऑगस्ट हा दिवस फाळणी शोकांतिका स्मृतीदिन) निमित्त प्रदर्शन आयोजित करण्यास व या उपक्रमांवरील होणाऱ्या एकूण **रु.१,५९,७००/- (अक्षरी एकूण रुपये एक लाख एकोणसाठ हजार सातशे फक्त)** एवढ्या रकमेच्या

अंदाजित खर्चाच्या मर्यादेत प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे. त्या अनुषंगाने सदर प्रदर्शनावर होणाऱ्या अंदाजित खर्चाचा तपशील पुढीलप्रमाणे आहे:-

अ.क्र.	तपशील	अंदाजित खर्च रक्कम (रूपये)
१	५४ (फ्रेम) (६ x ४)	१,३०,०००/-
२	फ्रेम डिसाईन खर्च	१६,०००/-
३	प्रदर्शन साहित्य कार्यालय ते कार्यक्रम स्थळ येथे ने-आण माल वाहतूक खर्च	८,८००/-
४	कार्यक्रम स्थळी होणारा आकस्मिक किरकोळ खर्च	४,९००/
एकूण		**१,५९,७००/-**

२. या बाबींवर होणारा खर्च **मागणी क्र. "झेडडी-०२, २२०५ कला व संस्कृती, १०४ पुराभिलेख, (०१) राज्य पुराभिलेख मंडळ, (०१)(०२) पुराभिलेख कार्यालये (अनिवार्य), (२२०५ १७९५), १३-कार्यालयीन खर्च"** या लेखाशीर्षातर्गत मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा. तसेच संचालक, पुराभिलेख संचालनालय, मुंबई यांना यासाठी नियंत्रक अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

३. सदर शासन निर्णय वित्त विभाग क्र. विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/२०१३/विनियम, भाग दोन, दिनांक १७ एप्रिल २०१५ वित्तीय अधिकार नियम पुस्तिका १९७८ भाग पहिला, उप विभाग तीन, अ.क्र. नियम २७ (२) (अ) नुसार प्रशासकीय विभागांना प्रदान केलेल्या प्राधिकारानुसार व सचिव, सांस्कतिक कार्य विभाग यांच्या मान्यतेने निर्गमित करण्यात येत आहे.

४. सदर उपक्रमासाठी होणाऱ्या खर्चाचे उपयोगिता प्रमाणपत्र संचालक, पुराभिलेख संचालनालय, मुंबई यांनी शासनास विहित वेळेत सादर करावे.

५. हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक क्रमांक २०२६०८१७१६४७३०१२४३ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने स्वाक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

GITA N YADAV

Digitally signed by GITA N YADAV
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Tourism and Cultural Affairs, 2.5.4.20=84EC8C867E177247130C5B2CE9EBE952BC911B16D489B87589C254E58ADC24EC, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=86C33C507529F3B895BCCC45E562FC0EBC4D9E29CBB4691C6759762E25DEC5EA, cn=GITA N YADAV
Date: 2026.08.17 16:49:10 +05'30'

(गिता यादव)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति:-

१. मा.मंत्री (सांस्कृतिक कार्य) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
२. महालेखापाल (लेखा परीक्षा/लेखा अनुज्ञेयता) महाराष्ट्र-१, मुंबई.
३. सचिव, सांस्कृतिक कार्य विभाग यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
४. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई

५. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
६. उप सचिव (सां.का.४), पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, मंत्रालय, मुंबई.
७. संचालक, पुराभिलेख संचालनालय,मुंबई.
८. अवर सचिव/कक्ष अधिकारी (अर्थसंकल्प), पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, मंत्रालय, मुंबई.
९. निवडनस्ती,सां.का.२